पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३

सुविचार - जीवन हे एक चित्रकला आहे आणि आपण त्याचे चित्रकार. प्रत्येक रंगाचा वापर करून आपल्या जीवनाचे सुंदर चित्र तयार करा.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७७,३२८.१९ | -५१६.३४ (०.६६%) |
| डॉलर | ₹ ९४.४३ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४२ | २९ |
| दिल्ली | ३६ | २७ |
| मुंबई | ३४ | २९ |
| नागपूर | ३८ | २६ |
| पुणे | ३९ | २३ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. ९ मे २०२६ | वर्ष २ रे | अंक १७७ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:५३ संध्या-६:५६

सोने – चांदी

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५१,५०० /- | २,५५,००० /- |

Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# दहावीच्या परीक्षेत मुलीच सरस

## यंदाच्या निकालात १७९ विद्यार्थी शंभरी पार; कोकण विभाग पुन्हा नंबर एक

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. हा निकाल विभागानुसार असून, आज दुपारी १ वाजता विद्यार्थ्यांना ऑनलाईन निकाल पाहता येणार आहे. निकालापूर्वी मंडळाने पत्रकार परिषदेत महत्त्वाची माहिती दिली.**

मंडळाचे अध्यक्ष त्रिभूवन कुलकर्णी यांन निकालासंदर्भातील तपशील जाहीर करताना सांगितले की, यंदा राज्याचा एकूण निकाल ९२.९ टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही कोकण विभागाने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात अव्वल स्थान कायम राखले आहे. तसेच मुलांच्या तुलनेत मुलींच्या निकालाची टक्केवारी अधिक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

राज्यातील एकूण १४ लाख २० हजार ४८६ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. परीक्षेचे निकाल लवकर जाहीर व्हावेत यासाठी दहावीची परीक्षा १० दिवस लवकर आयोजित केली होती. राज्य मंडळ स्तरावर समुपदेशकांची नियुक्ती देखील करण्यात आली होती.


९ विभागीय मंडळात हेल्पलाइन सुविधा उपलब्ध करण्यात आली होती. निकालाच्या आकडेवारीनुसार, मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९४.९६ टक्के आहे, तर मुलांचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे. मुलांच्या तुलनेत मुलींचा निकाल ५.४० टक्क्यांनी अधिक लागला आहे. कोकण विभागाने ९७.६२ टक्क्यांसह राज्यात पुन्हा एकदा अव्वल स्थान कायम ठेवले आहे. तर सर्वात कमी निकाल छत्रपती संभाजीनगर (८८.४१ टक्के) विभागाचा लागला आहे.



### विभागानुसार निकाल

कोकण ९७.६२%
कोल्हापूर ९५.४७%
मुंबई ९४.९७%
पुणे ९४.२४%
नाशिक ९०.९३%
अमरावती ९०.५०%
नागपूर ८९.०७%
लातूर ८८.४२%
छत्रपती संभाजीनगर ८८.४१%
राज्याचा एकूण निकाल ९२.०९%

### चोपड्याच्या स्वरा हरताळकरने गाठली शंभरी!



**चोपडा :** येथील विवेकानंद विद्यालयाच्या दहावीचा ऑनलाईन निकाल आज जाहीर झाला असून कु. स्वरा विनीत हरताळकर हिने १००% गुण मिळवून विद्यालयासह जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. स्वराच्या यशाने वडील विनीत हरताळकर, आई निता हरताळकर, आजोबा डॉ.विकास हरताळकर, आजी राधाबाई हरताळकर यांनी पेढे भरवून अभिनंदनाचा वर्षाव केला. दहावीच्या परीक्षेत कु. स्वरा हरताळकर हिने १००% गुण विवेकानंद विद्यालयात नवीन इतिहासात रचला आहे. तसेच इतर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणार आहे.

(सविस्तर वृत्त पान ४ वर)

## तमिळनाडूत विजय थलपतीचा सत्तास्थापनेचा मार्ग अखेर मोकळा!



वृत्तसंस्था । चेन्नई

तमिळनाडू विधानसभा निवडणुनकीत थलपती विजय यांच्या टीव्हीके पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र या पक्षाला निवडणुकीत बहुमताचा आकडा गाठता आलेला नव्हता. दरम्यान आता तमिळनाडूमध्ये सीपीआय , सीपीआय (एम) आणि व्हीसीके हे पक्ष विजयच्या टीव्हीके पक्षाला पाठिंबा देण्याच्या तयारीत असल्याची बाब समोर आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काँग्रेस नेते राहुल गांधी आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या तिन्ही पक्षांशी चर्चा करून त्यांना टीव्हीकेला बहुमताचा आकडा गाठण्यास मदत करण्यासाठी तयार केले आहे.

विजयच्या पक्षाने निवडणुकीत १०८ जगा जिंकल्या आहेत, तर काँग्रेसने पाच जागांवर विजय नोंदवला आहे. इतर तीन पक्षांचे प्रत्येकी २ आमदार आहेत. काँग्रेसकडून घेण्यात आलेल्या पुढाकारानंतर लहान पक्षांनी विजय यांच्या टीव्हीके पक्षाला पाठिंबा देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीपीआय आणि सीपीआय-एम हे दोन्ही पक्ष राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होण्याच्या विरोधात आहेत. दुसरीकडे व्हीसीकेने (पान २ वर)

## थोडक्यात

### निकालाचा टक्का घसरला!

**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेत नाशिक विभाग राज्यात पाचव्या स्थानावर राहिला. विभागाचा निकाल ९०.५३ टक्के लागला. मागील वर्षाच्या तुलनेत २.५१ टक्क्यांनी घसरण झाली. यावर्षीही मुलींनी मुलांपेक्षा जोमदार कामगिरी केली. विभागात नंदुरबार जिल्हा (९३.७१) अग्रस्थानी तर जळगावचा निकाल सर्वात कमी (८५.२५) लागला. नाशिकचा (९२.६६) आणि धुळे जिल्ह्याचा निकाल ९२.०५ टक्के लागला. एकूण निकालात मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा ५.४० टक्क्यांनी अधिक आहे.

### कांद्याचे भाव घसरले! क्विंटलला ५० रुपये दर

**सटाणा ।** अवकाळी पाऊस, गारपीट आणि उत्पादन खर्चाच्या वाढत्या ओझ्यामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीत आता कांद्याच्या घसरलेल्या दरामुळे आणखी भर पडली आहे. सटाणा कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरुवारी (दि. ७) कांद्याला अवघा ५० रुपये प्रति क्विंटल दर मिळाल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आणि बाजार समिती परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. बागलाण तालुक्यातील कऱ्हे येथील शेतकरी जितेंद्र साळुंखे यांनी आपला कांदा विक्रीसाठी सटाणा कृषी उत्पन्न बाजार समितीत आणला होता.

### अशा किती ममता बॅनर्जी आल्या, तरी देश वाकणार नाही

**अहिल्यानगर ।** पश्चिम बंगालमधील सत्तांतरानंतर राज्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधत राजकीय वातावरण चांगलेच तापवले आहे. बांगलादेशी घुसखोरीमुळे पश्चिम बंगाल अस्वस्थ झाले होते. जनतेने ममता बॅनर्जी यांचे सरकार उखडून फेकत जंगलराज संपवले, असा घणाघात करत अशा किती ममता बॅनर्जी आल्या तरी देशाची राज्यघटना आणि लोकशाही अधिक मजबूत आहे, असे ठणकावत विखेंनी विरोधकांना थेट इशारा दिला.

## डी.एल.एड. प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया सुरू

वृत्तसंस्था । मुंबई



महाराष्ट्रच नव्हे तर बहुतांश प्रांतात शिक्षकी पेशाकडे जाण्यास बहुतांश युवकांचा कल दिसून येतो. ही एक आदर्श सेवा तर आहेच पण एक सरळमार्गी पेशा म्हणून पण या नोकरीकडे पाहल्या जाते. म्हणूनच त्यासाठी आवश्यक शिक्षणशास्त्रातील पदवी किंवा पदविका प्राप्त करण्याकडे ओढा दिसून येतो. आता त्यासाठीच सूचना निघाली आहे. आता ऑनलाईन पद्धत रुजू झाली असून त्यामार्फत प्रवेश होतील.


महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील करिअरसाठी आवश्यक असलेल्या डी.एल.एड. (डिप्लोमा इन इलिमेंटरी एज्युकेशन) या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाचा बिगुल वाजला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शासकीय कोट्यातील प्रवेशाची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबवण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्रद्वारे करण्यात आली आहे. प्रवेशाचे वेळापत्रक आणि संकेतस्थळ असे आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक डॉ. हेमंत वसेकर यांनी प्रसिद्धी (पान २ वर)

## पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारीच; आज होणार शपथविधी

वृत्तसंस्था । कोलकाता

**भाजप नेते सुवेंदू अधिकारी पश्चिम बंगालचे पुढील मुख्यमंत्री असणार आहेत. शुक्रवारी कोलकात्यात भाजपच्या आमदारांची बैठक त्यांची गटनेतेपदी निवड झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन माझी यांच्या उपस्थितीत सुवेंदू अधिकारी यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं. अधिकारी यांच्या नावाची घोषणा यावेळी करण्यात आली.**

सुवेंदू अधिकारी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत नंदिग्राम आणि भवानीपूर मतदारसंघांमधून विजयी झाले आहेत. त्यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव केला आहे. पश्चिम बंगालचे भाजप



अध्यक्ष समिक भट्टाचार्य यांनी अधिकारी यांच्या नावाचा प्रस्ताव आमदारांच्या बैठकीत ठेवला. आमदारांनी त्यांच्या नावाला पाठिंबा दिला. अधिकारी ५५ वर्षांचे आहेत. कधीकाळी ते ममता बॅनर्जी यांचे अतिशय निकटवर्तीय होते. पश्चिम बंगालमध्ये भाजपला २९३ पैकी २०७ जागा मिळाल्या आहेत. अधिकारी बंगालमध्ये भाजपचे पहिले मुख्यमंत्री असतील. त्यांचा शपथविधी उद्या संपन्न होईल.

शेजारच्या आसाममध्ये भाजपनं काँग्रेसमधून आलेल्या हिमंता बिस्व सरमा यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची धुरा सोपवली. आता तोच पॅटर्न पश्चिम बंगालमध्ये पाहायला मिळत आहे. सरमा यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत कमळ हाती धरलं. सरमा यांनी २०१५ मध्ये भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर २०१६ मध्ये राज्यात भाजपचं सरकार आलं. पण त्यावेळी भाजपनं त्यांना मुख्यमंत्रिपद दिलं नाही. २०२१ मध्ये राज्यात पुन्हा एकदा भाजपनं निवडणूक जिंकत सरकार स्थापन केलं. तेव्हा सरमा यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची सुत्रं देण्यात आली.

**भाजपनं हिमंता पॅटर्न राबवला**

आता बंगालमध्ये भाजपनं हिमंता पॅटर्न राबवला आहे. हिमंता काँग्रेस सोडून भाजपमध्ये गेले. तर सुवेंदू तृणमूल काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेशकर्ते झाले. दोन्ही ठिकाणी विरोधकांना धक्का बसला. त्यात या दोन्ही नेत्यांची भूमिका महत्त्वाची राहिला. हिमंता यांना २०२१ मध्येच भाजपनं मुख्यमंत्री केलं. आता बंगालमध्ये सत्ता आल्यावर भाजपनं सुवेंदू अधिकारी यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची सुत्रं दिली आहेत. आसाम मधला हिमंता पॅटर्न बंगालमध्ये वापरण्यात आला आहे. पक्षांतर केलेल्या नेत्यांकडे भाजपनं मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सोपवली आहे. आसाम आणि बंगाल या शेजारी देशांमध्ये सेम पॅटर्न राबवण्यात आला आहे. (पान २ वर)

## 'नुसते कागदी घोडे नाचवू नका': मंत्री रावल यांच्याकडून अधिकाऱ्यांची खरडपट्टी

वृत्तसंस्था । धुळे

**कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्याशी संवाद साधावा, त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि विविध पिके घेण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढले पाहिजे, यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करा. केवळ कागदी घोडे नाचवू नका, अशा शब्दांत पालकमंत्री जयकुमार रावल यांनी अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली.**



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात शुक्रवारी पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगाम आढावा बैठक पार पडली. यावेळी खासदार शोभा बच्छाव, आमदार मंजुळा गावित, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप आदी उपस्थित होते.

बैठकीत बोलताना पालकमंत्री जयकुमार रावल यांनी जिल्ह्यात चार लाख ३७ हजार हेक्टर लागवडीयोग्य क्षेत्र असताना प्रत्यक्ष पेरणीचे क्षेत्र कमी का राहते, याचा सखोल अभ्यास करण्याचे निर्देश दिले. पडीक जमीन किंवा पेरणी न होण्यामागील कारणे शोधून त्याबाबत तालुकानिहाय आणि सर्कलनिहाय सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम वेळेत मिळावी, यासाठी विमा कंपन्यांशी समन्वय साधण्याचे आदेशही त्यांनी दिले. प्रत्येक तालुक्यात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध राहील आणि त्याचे वितरण पारदर्शक पद्धतीने होईल, यावर लक्ष ठेवण्याच्या सूचना त्यांनी केल्या.शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदी करावे आणि खरेदी करताना पक्के बिल घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. बियाण्यांच्या नमुन्यांची नियमित तपासणी करून शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही, याची दक्षता घ्यावी. जर बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत शंका निर्माण झाली किंवा बियाणे उगवले नाही, तर संबंधित शेतकऱ्यांनी तातडीने तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

धुळे जिल्ह्यातील कापूस उत्पादन सध्या प्रति (पान २ वर)

## मुक्ताईनगरात अल्पवयीन मुलीवर अत्याचार, अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर केला व्हायरल

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**मुक्ताईनगर तालुक्यातील एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बळजबरीने अत्याचार करून तिचा आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी नराधम आरोपीविरुद्ध बलात्कार, पोक्सो आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला असून सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास हरताळा शेत शिवारात आरोपी ईश्वर सिद्धार्थ वाघ (रा. मुक्ताईनगर, ह.मु. पुणे) याने पीडित मुलीला गाठले. तिला जीवे मारण्याची धमकी देऊन तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केले. एवढ्यावरच न थांबता या नराधमाने पीडितेचा आक्षेपार्ह व्हिडिओ देखील तयार केला. आरोपीने



६ मे २०२६ रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास आपल्या इन्स्टाग्राम आयडीवरून पीडितेचा अश्लील व्हिडिओ व्हायरल केला. या प्रकारामुळे पीडितेच्या कुटुंबाला मोठा मानसिक धक्का बसला आहे. अखेर पीडित मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून ७ मे रोजी रात्री उशिरा मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बारबोले आणि पोलीस निरीक्षक आशिष अडसूळ यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली. सपोनि राजेंद्र चाटे आणि पोलीस निरीक्षक आशिष अडसूळ या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## कासोद्यात प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाण्यासह १० लाखांचा मुद्देमाल जप्त

### कृषी विभागाची धडक कारवाई; गुप्त माहितीच्या आधारे रॅकेट आले उघडकीस

प्रतिनिधी । एरंडोल

**तालुक्यातील कासोदा येथे कृषी विभागाने गुरुवारी मोठी कारवाई करत प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाण्यांच्या अवैध विक्रीचे रॅकेट उघडकीस आणले. या कारवाईत सुमारे पावणेपाच लाखांचे बियाणे आणि पाच लाखांची एक चारचाकी जप्त करण्यात आली आहे. तसेच दोन जणांविरुद्ध विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्यात अवैध बियाणे विक्री करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.**

कृषी विभागाला कासोदा परिसरात काही व्यक्तींकडून शेतकऱ्यांना गुप्तपणे प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाण्यांची विक्री केली जात असल्याची माहिती मिळाली होती. विशेष म्हणजे ही विक्री कोणतीही अधिकृत परवानगी नसताना छुप्या पद्धतीने सुरू असल्याचे प्राथमिक माहितीत स्पष्ट झाले होते. शेतकऱ्यांना अधिक उत्पादन आणि कीड प्रतिबंधक गुणधर्मांचे आमिष दाखवून या बियाण्यांची विक्री केली जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यानुसार कृषी विभागाने नियोजनबद्ध पद्धतीने तपास मोहीम हाती घेतली. गुरुवारी कृषी विभागाच्या पथकाने कासोदा येथे अचानक (पान २ वर)



### कारवाईत यांचा होता समावेश

कारवाईत जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक विकास बोरसे, कृषी अधिकारी परेश बडगुजर, सचिन पाटील तसेच पोलीस विभागाकडून कासोदा पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्रीकांत पाटील यांनी सहभाग घेतला. निविष्ठा व गुणनियंत्रण विभागाचे संचालक सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी प्रविण देशमुख, तंत्र अधिकारी (गुणनियंत्रण) उल्हास ठाकुर, जिल्हा कृषी अधीक्षक कुरबान तडवी, कृषी विकास अधिकारी पद्मनाभ म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

## टंचाईसदृश्यतेने चाऱ्याला जिल्हाबंदी करावी लागणार : जलसंपदामंत्री

प्रतिनिधी । अहिल्यानगर

**सध्या जनावरांसाठी चारा उपलब्ध असला तरी पुढील आव्हान लक्षात घेऊन जिल्ह्यातून चारा बाहेर नेण्यास बंदी घालावी लागणार असल्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी सांगितले. टंचाईची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी आपण प्रत्येक तालुक्यात बैठका घेणारा असल्याचेही त्यांनी जाहीर केले.**

माध्यमांशी बोलताना मंत्री विखे म्हणाले, जिल्ह्यातील टंचाईसदृष्य परीस्थिती विचारात घेवून धरणातील पाणी साठ्याचे नियोजन करण्यास प्राधान्य आहे. टंचाई परिस्थीतीला सामोरे जाण्यासाठी प्रशासन सतर्क आहे. प्रत्येक तालुक्याचा दौरा करून परीस्थिती जाणून घेणार आहे. जनावारांसाठी चारा उपलब्ध व्हावा म्हणून चारा उत्पादन योजनेच्या अंमलबजावणीचे राज्यस्तरावर धोरण घ्यावे लागेल. सद्यपरिस्थितीत चारा उपलब्ध असला तरी, पुढचे आव्हान लक्षात घेवून जिल्हयातून चारा बाहेर नेण्यास बंदी (पान २ वर)

## संपादकीय

### ऑपरेशन सिंदूर पुन्हा शक्य आहे का?

पहलगाममधील नृशंस दहशतवादी हल्ल्याला (२२ एप्रिल) प्रतिसाद म्हणून भारताने ७ मे रोजी पहाटे १ ते १.२५ या काळात पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले केले. त्या कारवाईस नाव दिले गेले 'ऑपरेशन सिंदूर'. ती अर्थातच २५ मिनिटांत संपणार नव्हती. कारण पाकिस्तानही तयारीत होता आणि त्यातून त्यांनी दिलेल्या उत्तरानंतर हल्ले-प्रतिहल्ल्यांचे धोकादायक लघुपर्व सुरू झाले. ७ मे रोजी या कारवाईस एक वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्ताने कारवाईशी संबंधित भारताच्या सामरिक, राजनयिक आणि राजकीय धोरणांचा आढावा घेणे समयोचित ठरते. ही कारवाई थांबवलेली नसून, तीस केवळ विराम देत असल्याचे भारताने त्यावेळी जाहीर केले होते. याचा अर्थ आजही तशा स्वरूपाचा दहशतवादी हल्ला भारतात काश्मीर किंवा इतर कुठेही घडला तर 'ऑपरेशन सिंदूर' फेरकार्यान्वित होईल. ती वेळ येऊ न देण्यासाठी खबरदारी घेणे हे आपल्यासाठी अधिक श्रेयस्कर. कारण युद्ध आणि युद्धसदृश कारवायांनी प्रश्न सुटत नाहीत आणि युद्धेही संपुष्टात येत नाहीत हे रशिया-युक्रेन, अमेरिका, इस्रायल-इराण आणि बराच काळ इस्रायल-हमास संघर्षाच्या निमित्ताने आपण पाहात आलो आहोत. अशा संघर्षांमध्ये कोणत्याही एका देशाचा किंवा समूहाचा निर्णायक विजय होत नाही, मात्र त्यानिमित्ताने रोजगार बेचिराख होतात, अर्थव्यवस्थांना दीर्घकालीन पंगुत्व येते.जागतिकीकरणाच्या घुसळणीत अशा संघर्षांतून अनेकदा सागरी व्यापारी मार्ग असुरक्षित बनतात, हवाई मार्ग बंद होतात आणि अर्थाभिसरण गोठते. चर्चा आणि सामोपचारानेच सुटू कोणतेही वाद शकतात, ही भारताची भूमिका ६० वर्षांपूर्वीही होती नि आजही आहे. या पार्श्वभूमीवर शस्त्रास्त्रसज्ज राहून आणि कुरापतखोर शेजाऱ्यावर हल्ले करून त्यास जरब बसवण्याची रणनीती खरोखरच फलदायी ठरते का, याचा विचार सिंदूर कारवाईच्या वर्षपूर्तीनिमित्त होणे आवश्यक. नरेंद्र मोदी यांचे सरकार सन २०१४ मध्ये केंद्रात प्रथम सत्तारूढ झाल्यानंतर काश्मीर आणि पाकिस्तानबाबत अधिक रोखठोक धोरण अंगीकारण्याकडे कल दिसून येतो. कोणतेही नवे सरकार, जुन्या धोरणांचा फेरविचार करतच असते त्यामुळे या पवित्र्यामध्ये गैर काहीच नाही. मात्र, पाकिस्तानबाबत 'घर में घुस के' धोरणातून प्रत्यक्षात पलीकडून होणारे हल्ले खरोखरीच थांबले का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. कारण २०१६ मध्ये उरी येथे लष्करी आस्थापनेवर झालेल्या हल्ल्यानंतर भारताने प्रत्यक्ष ताबारेषा ओलांडून पाकिस्तानच्या दहशतवादी तळांवर सर्जिकल स्ट्राइक केले. ती भारताची व्याप्त काश्मीर भागात केलेली आणि युद्ध किंवा व्यापक संघर्षाच्या चौकटीबाहेरील कित्येक वर्षांतील पहिली कारवाई ठरली.तरीदेखील २०१९ मध्ये 'पुलवामा' घडलेच. त्यावेळी पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा या प्रांतातील बालाकोटमध्ये भारताने तेथील दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. हे हल्ले थेट पाकिस्तानच्या भूमीत घडले. त्यानंतरही काही वर्षांनी 'पहलगाम' घडलेच. त्यामुळेच 'ऑपरेशन सिंदूर' हाती घ्यावे लागले. यातून मिळालेला एक महत्त्वाचा धडा म्हणजे, पाकिस्तानी भूमीवर लष्करी कारवाया करूनही त्या देशाचा दहशतवादी कुरापतींचा कंड शमत नाही. किंबहुना, अशा प्रकारे भारताच्या प्रतिहल्ल्यांनाही तो देश सरावू लागल्याचे दिसून येत आहे. ऑपरेशन सिंदूरच्या सुरुवातीच्या काही तासांमध्ये लढाऊ विमानांचा वापर करताना आपल्याकडून काही व्यूहरचनात्मक त्रुटी झाल्या, अशी कबुली खुद्द सैन्यदल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनीच पुढे सिंगापूरमधील एका वार्तालापात दिली होती. त्या सुधारून पुढे भारताने हल्ले तीव्र केले नि आपल्याकडे क्षेपणास्त्र व ड्रोन बचाव प्रणाली सुसज्ज ठेवली, त्यामुळे पुढील कारवाईत भारताचाच वरचष्मा राहिला.

# अवैध नळकनेक्शनसह नाले सफाईचा मुद्दा पेटला

## मनपा स्थायी समिती सभेत दुबार पाणीपट्टी बिले रद्द; अजेंड्यावरील ११ विषयांना मंजुरी

प्रतिनिधी । धुळे

**महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत पाणीपुरवठा, अवैध नळकनेक्शन, इंग्रजी माध्यम शाळा, नाले सफाई आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न यावर जोरदार चर्चा झाली. चर्चेनंतर अजेंड्यावरील सर्व ११ विषयांना मंजुरी देण्यात आली. महापालिकेच्या स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज सभापती लताबाई पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.**

सभेला उपायुक्त करूणा डहाळे, नगरसचिव मनोज वाघ तसेच सदस्य अमोल मासुळे, निलेश नेमाणे, विक्रम थोरात, सनी चौधरी, अमिर पठाण, योगिता कुटे आदी उपस्थित होते. दुबार पाणीपट्टी बिले रद्द करण्याचा निर्णय-पाणीपट्टी कर वसुली विभागातील दुबार बिले निर्लेखित करण्याच्या विषयावर वसुली अधीक्षक जाधव यांनी माहिती देतांना सांगितले की, ऑनलाईन प्रणालीमध्ये दुबार तसेच अस्तित्वात नसलेली बिले तयार झाली होती. फिटर व कर्मचाऱ्यांच्या पाहणीनंतर ७९ दुबार व अस्तित्वात नसलेली बिले आढळून आली असून त्यांची रक्कम १० लाख ३५ हजार ७६९ रुपये इतकी आहे. ही वसूल होण्याची शक्यता नसल्याने ती बिले ऑनलाईन प्रणालीतून रद्द करण्यासाठी विषय सभेत मांडण्यात आला. यावर सदस्य अमोल मासुळे यांनी या निर्णयामुळे नागरिकांना दिलासा मिळणार असल्याचे सांगत प्रशासनाचे अभिनंदन केले. मात्र, शहरासह हद्दवाढीतील गावांमध्ये हजारो अवैध नळकनेक्शन असल्याने मनपाचे लाखो रुपयांचे नुकसान होत असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. काही फिटर व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने व्यावसायिक अवैध नळकनेक्शन दिल्याचा आरोप करत प्रशासनाने कठोर धोरण राबवावे, अशी मागणी त्यांनी केली. अमृत योजनेतील कामांची माहिती मागवली सदस्य विक्रम ऊर्फ छोटू थोरात यांनी अमृत योजनेअंतर्गत शहरात कोठे पाईपलाईन टाकण्यात आली, कोणत्या ठेकेदारांना कामे देण्यात आली, किती व्हॉल्व बदलण्यात आले, दुरुस्तीची कामे किती झाली आणि निघालेल्या साहित्याचे काय झाले याची सविस्तर माहिती सादर करण्याची मागणी केली. आपल्या लोकांना बेकायदेशीर नळकनेक्शन दिल्याचा आरोपही त्यांनी केला. ज्या ठिकाणी तीन ते चार इंची पाईपची गरज असताना पाच इंची पाईप टाकण्यात येत असल्याबाबतही त्यांनी सवाल उपस्थित केला. यावर अमोल मासुळे यांनी मिल परिसरातील श्रमिक व कष्टकरी कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी शाळा क्रमांक २८ मध्येही इंग्रजी माध्यम सुरू करण्याची मागणी केली. सदस्य निलेश नेमाणे यांनी इंग्रजी शिक्षण ही काळाची गरज असल्याचे सांगत मनपाच्या सर्व शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने इंग्रजी माध्यम सुरू करण्याची सूचना केली. त्याची सुरुवात चित्तोड, महिंदळे आणि मोराणे येथून करावी, असे त्यांनी सांगितले.




### ➤पाणीपुरवठा अन् घंटागाडीचा प्रश्न सभेत तापला

प्रभाग क्र.१ मध्ये पाणी व घंटागाडीचा प्रश्न योगिता कुटे यांनी प्रभाग क्रमांक १ मधील पाणीपुरवठा आणि घंटागाडीचा प्रश्न सभेत मांडला. काही भागात पाच ते सहा दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. लग्नसराईमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली असून पाणीपुरवठा दोन ते तीन दिवसाआड करावा. घंटागाडी आठ दिवस येत नसल्याने नागरिकांना कचरा साठवून ठेवावा लागत असल्याची तक्रारही त्यांनी केली.

**चितोडमधील पाणीप्रश्न आणि नाला सफाईचा मुद्दा**

निलेश नेमाणे यांनी चितोडमधील सोनार गल्ली परिसरात नागरिकांना आठ ते दहा दिवस पाणी मिळत नसल्याची तक्रार मांडली. संबंधित व्हॉल्व बदलून पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच बेकायदेशीर नळकनेक्शनमुळे पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असल्याने त्यांचा शोध घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

चितोड गावात पावसाळ्यात घरांमध्ये पाणी शिरत असल्याची गंभीर समस्या मांडताना नेमाणे यांनी बायपासमुळे पाण्याचा निचरा होत नसल्याचे सांगितले. त्यामुळे नाला सफाईची सुरुवात सुशी नाल्यापासून करावी तसेच नाल्याला संरक्षण भिंत बांधावी, अशी मागणी त्यांनी केली. प्रभाग क्रमांक १९ मधील चाळीसगाव रोड चौफुलीपासून सुरू होणाऱ्या नाल्यामुळे पावसाळ्यात घरांमध्ये पाणी शिरत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे नाले सफाईची कामे प्रभाग १९ पासून सुरू करावीत, अशी मागणी त्यांनी केली. तसेच पाणीपुरवठा रात्री उशिरापर्यंत सुरू राहत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगत भाग छोटे करून व्हॉल्व बसवण्याची सूचना केली.

### गाळ निश्चित केलेल्या जागेवर टाकणार

सभेत पावसाळ्यापूर्वी शहरातील नैसर्गिक नाल्यांची मोठ्या प्रमाणावर सफाई करण्याच्या विषयालाही मंजुरी देण्यात आली. त्यानुसार जेसीबी आणि पोकलेनच्या सहाय्याने नाल्यांतील गाळ काढून ट्रॅक्टर व डंपरद्वारे त्याची वाहतूक केली जाणार आहे. मनपा मालकीच्या वजन काट्यावर गाळाचे वजन करून तो मनपाने निश्चित केलेल्या अधिकृत जागी टाकण्यात येणार आहे. यासाठी आलेल्या निविदा दरांनाही सभेत मंजुरी देण्यात आली.

## विनोबा ॲपअंतर्गत जिल्हा व तालुकास्तरीय विजेत्या शिक्षकांचा सन्मान

प्रतिनिधी । नंदुरबार

**जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, ओपन लिंक्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या विनोबा ॲप उपक्रमांतर्गत उत्कृष्ट शैक्षणिक पोस्ट व नाविन्यपूर्ण उपक्रम सादर करणाऱ्या शिक्षकांचा जिल्हास्तरीय गौरव समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात पोस्ट ऑफ द मंथ व मॉर्निंग असेंब्ली या उपक्रमांमध्ये जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.**

याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या हस्ते विजेत्या शिक्षकांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास अभिनव कोल्हे यांची ही उपस्थिती होती. पोस्ट ऑफ द मंथ जिल्हास्तरीय विजेते म्हणून मंदाकिनी वळवी (जि.प.शाळा टोकरतलाव), अनुपम १ वळवी (जि.प. शाळा टोकरतलाव) आणि महेंद्र इशी (जि. प. शाळा विखरण) तसेच मॉर्निंग असेंब्ली जिल्हास्तरीय विजेते म्हणून महेंद्र अशोक ईशी (जि.प.शाळा विखरण), सपना हिरे (जि. प. शाळा अंबापुर) आणि गायत्री पाडवी (जि.प. शाळा रनाळे) यांचा सन्मान करण्यात आला. याशिवाय तालुकास्तरीय पोस्ट ऑफ द मंथ विजेते म्हणून रंजना साबळे (जि.प.शाळा नांदरखे) यांचा ही प्रमाणपत्र भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास ओपन लिंक्स फाउंडेशनचे प्रकल्प ऑफिसर विकास मोरे उपस्थित होते.

# नंदुरबार शहरात सिटी बस सुरू करावी

## ग्राहक पंचायत आणि महाराष्ट्र प्रवासी महासंघाचे पालकमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी । नंदुरबार

**शहरात सिटी बस सुरू करण्यासाठी पालकमंत्र्यांनी ठोस निर्णय घ्यावा अशी मागणी ग्राहक पंचायत आणि महाराष्ट्र प्रवासी महासंघ नंदुरबार शाखेने केली आहे. याबाबत पालकमंत्री ना. हसन मुश्रीफ यांना निवेदन देण्यात आले आहे.**

त्यात म्हटले आहे की, यापूर्वीही तत्कालीन पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांना पत्र देण्यात आले होते. त्यांनी जिल्हा नियोजन बैठकीत जिल्हाधिकारी आणि नगर पालिका तसेच एसटी आगार यांना सूचना दिल्या होत्या. मात्र याबाबत कुठलीही अंमलबजावणी झाली नसल्याम ळे पुन्हा निवेदनातून मागणी करण्यात येत आहे. नंदुरबार शहर जिल्ह्याचे म ख्यालय आहे. जिल्हा शासकीय कार्यालयांमध्ये जाण्यासाठी सिटीबस सेवा नसल्याने याबाबत प्रवासी महासंघाचे तालुका अध्यक्ष महादू हिरणवाळे यांनी पाठपुरावा केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासह जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, जि.प. इमारत, आदिवासी प्रकल्प कार्यालय, मेडिकल कॉलेज, नर्सिंग कॉलेज, जिल्हा रुग्णालय, मध्यवर्ती कारागृह, पासपोर्ट कार्यालय, समाज कल्याण कार्यालय, जात पडताळणी कार्यालय, आरटीओ आदी शासकीय कार्यालये शहरापासून लांब आहेत. त्यामुळे या ठिकाणी येण्यासाठी नागरिकांना सार्वजनिक बससेवा उपलब्ध होण्याबाबत यापूर्वीही ग्राहक पंचायत महाराष्ट्र व प्रवासी महासंघाने निवेदन दिले होते. नगर पालिका आणि राज्य परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक तसेच नंदुरबार आगार प्रमुख यांना नंदुरबार शहरात सिटी बसबाबत पत्र देण्यात आले. याशिवाय नवापूर, शहादा, तळोदा या भागातून येणाऱ्या नाशिककडे जाणाऱ्या सर्व बसेस नंदुरबारचे मुख्य बसस्थानक ते नवापूर चौफुलीपर्यंत आणि जिल्हा रुग्णालयापर्यंत प्रवाशांना चढ-उतार घेणे बाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात. तसेच स्टेट बँक व नाट्य मंदिर स्टॉप, धुळे चौफुली, नवापूर चौफुली, धानोरा रोड, करण चौफुली, आदी ठिकाणी प्रवाशांना थांबण्यासाठी प्रवासी निवारा उभारण्याची आवश्यकता आहे. शहरात समांतर सिटी बस सेवा उपलब्ध व्हावी अशी मागणी ग्राहकतीर्थ स्व.बिंदू माधव जोशी संचलित ग्राहक पंचायत महाराष्ट्र व प्रवासी महासंघ नंदुरबार जिल्हाध्यक्ष सुरेश जैन, तालुकाध्यक्ष महादू हिरणवाळे, सदस्य बी.डी. गोसावी, वैभव करवंदकर, डॉ. गणेश ढोले, ॲड. निलेश देसाई, ॲड. मोहन बोडस, भरत माळी, अपेक्षा चव्हाण, अबोली चंद्रात्रे, अशोक यादबोले, दर्शन ठक्कर, नितीन पाटील, रघुनाथ अहिरे, जगदीश ठाकुर आणि सदस्यांनी केली आहे.

## पान १ वरुन

### कासोद्यात प्रतिबंधित एचटीबीटी......

धाड टाकली. तपासणीदरम्यान योगेश बळवंत पाटील हा व्यक्ती संशयास्पदरीत्या कापूस बियाण्यांचा साठा करून त्यांची विक्री करत असल्याचे निदर्शनास आले. अधिकाऱ्यांनी सखोल तपासणी केली असता 'प्रीमियम रिसर्च हायब्रीड कॉटन सीड', 'श्री गणेशा +५' आणि 'आकाश +५' या नावांची प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाण्यांची ४०० पॅकेट जप्त करण्यात आली. प्रत्येक पॅकेटमध्ये ४५० ग्रॅम बियाणे असून, एकूण आठ पोत्यांमध्ये हा साठा ठेवण्यात आला होता. कारवाईत सुमारे ४ लाख ७५ हजार २०० रुपयांचे प्रतिबंधित एचटीबीटी बियाणे जप्त करण्यात आले. तसेच बियाण्यांची वाहतूक आणि साठवणुकीसाठी वापरण्यात येत असलेली मारुती स्विफ्ट डिझायर कारही पोलिसांनी ताब्यात घेतली. वाहनाची अंदाजे किंमत ५ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे एकूण जप्त मुद्देमालाची किंमत जवळपास १० लाख रुपयांपर्यंत पोहचली आहे. या प्रकरणी निखिल टोळकर यांनी कासोदा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून योगेश पाटील (रा. सौंदाणे, ता. जि. धुळे) आणि नितीन देवरे (वाडीभोकर, ता. जि. धुळे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयितांवर बियाणे कायदा १९६६, बियाणे नियम १९६८, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कापूस बियाणे अधिनियम २००९ आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून या अवैध व्यवहारामागील इतर संबंधितांची माहितीही तपासली जात आहे.

### पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री......

मुख्यमंत्री शनिवारी सकाळी ११ वाजता कोलकाता येथील ब्रिगेड परेड ग्राउंडवर पदाची शपथ घेतील. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांच्यासह एनडीएचे अनेक प्रमुख नेते या शपथविधी समारंभास उपस्थित राहतील.

### डी.एल.एड. प्रथम वर्ष......

निवेदनाद्वारे माहिती दिली की प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांना ११ मे २०२६ पासून ऑनलाईन अर्ज भरता येतील. उमेदवारांनी सविस्तर माहिती, प्रवेश नियमावली, वेळापत्रक आणि अध्यापक विद्यालयांची यादी पाहण्यासाठी परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

### नुसते कागदी घोडे नाचवू......

हेक्टर ३०१ किलो असून ते वाढवून ३३० किलो प्रतिहेक्टर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात यावे, असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच कृषी अधिकाऱ्यांनी व्हॉट्सॲप समूहांच्या माध्यमातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना वेळोवेळी शेतीपूरक माहिती द्यावी आणि जनजागृती करावी, असेही ते म्हणाले.

### टंचाईसदृश्यतेने चाऱ्याला जिल्हाबंदी......

करावी लागणार आहे. एल निनोचा धोका लक्षात घेवून धरणातील पाणीसाठा ३१ऑगस्टपर्यत राखून ठेवण्याचे नियोजन राज्यभरातच केले आहे. जिल्ह्यात यंदा धरणातील पाण्याचे नियोजन चांगल्या पध्दतीने झाल्याने पाणीसाठा टिकून आहे. मात्र पिण्याच्या पाण्यास प्राधान्य देवून भविष्यातील नियोजन विभागाने केले आहे. पाण्याच्या उद्भवाचे बळकटीकरण करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई भेडसावणार नाही, यासाठी प्रशासकीय स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून नियोजन करण्यात आले आहे. मागणी असेल तिथे टँकरची व्यवस्था करण्यास प्राधान्य दिले आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आपण दौरा करणार असून बैठकांमधून टंचाईग्रस्त भागातील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.जनावारांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर नसला तरी, भविष्यातील धोका विचारात घेवून मागील वर्षाप्रमाणेच पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून चारा उत्पादन योजनेची अंमलबजावणी करावी लागेल.

### तमिळनाडूत विजय थलपतीचा......

तामिळनाडूच्या राजकारणात कोणताही बाह्य हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही अशी भूमिका स्पष्ट केली आहे. आम्ही लोकांनी दिलेला जनादेश बाजूला ठेवून पुन्हा निवडणुकीला सामोरे जाऊ शकत नाहीत, असे एका सीपीआय (एम) नेत्याने इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले. याबरोबरच सध्याच्या राजकीय परिस्थितीचा फायदा घेत एआयडीएमके आणि डीएमके यांच्यात युती होऊ शकते, याची भीती देखील या तीन पक्षांना आहे. लोकांनी आधीच डीएमके आणि एआयडीएमके यांना नाकारले आहे. लोकांनी निवडून न दिलेलं सरकार का अस्तित्वात यावं?फ्फ़असे एक सीपीआय नेते म्हणाले. व्हीसीकेच्या सूत्रांनी सांगितले की, ते सीपीआय आणि सीपीआय (एम) या पक्षांनी घेतलेल्या निर्णयाबरोबर जातील.

## सुशीनाल्यावरील अतिक्रमण हटाव मोहीम तिसऱ्या दिवशीही सुरू; २५ घरे जमीनदोस्त

प्रतिनिधी । धुळे

देवपूरमधील बहुचर्चित सुशीनाल्याच्या नैसर्गिक रुंदीला बाधा आणणारी आणि पूररेषेतील कच्ची-पक्की अतिक्रमणे हटविण्याची मोहीम प्रशासनाकडून सलग तिसऱ्या दिवशीही राबविण्यात आली. या कारवाईत आज तीन जेसीबी आणि पोकलेनच्या सहाय्याने अतिक्रमित बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली.

जुन्या आग्रा रोडवरील सुशीनाल्यावरील फरशीपूल परिसरात सुमारे २५ कच्ची व पक्की घरे हटविण्यात आली. संपूर्ण कारवाईदरम्यान मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान, देवपूर परिसरातील सुशी नाल्यालगत व एल. एम. सरदार स्कूलमागील लाला सरदारनगर भागातील घरांवरील संभाव्य निष्कासन कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने तात्पुरता दिलासा दिला आहे. दाखल याचिकेवरील सुनावणीत खंडपीठाने संबंधित सक्षम प्राधिकरणाला आठ आठवड्यांत याचिकाकर्त्यांच्या हरकतींवर निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. तोपर्यंत ८२ याचिकाकर्त्यांवर कोणतीही कठोर कारवाई न करण्याचे आदेश देण्यात आल्याने त्या भागातील घरे वगळून उर्वरित ठिकाणी अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली.

## नंदुरबारात आज सुरेल गीतांचा कार्यक्रम ; स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या स्मृतींना उजाळा मिळणार

प्रतिनिधी । नंदुरबार

**सुप्रसिद्ध गायिका स्व. आशा भोसले यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी दि.९ मे रोजी सायंकाळी ६ वाजता श्रॉफ हायस्कूलच्या प्रांगणात विशेष संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सुरेल गीतांची मेजवानी सादरीकरणातून रसिकांना अविस्मरणीय नजराणा पेश केला जाणार आहे.**

या कार्यक्रमाचे आयोजन संकल्प ग्रुपचे अध्यक्ष कैलास मराठे, कार्याध्यक्ष रणजित राजपूत यांनी केले आहे. यशस्वीतेसाठी नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांचे सहकार्य लाभत आहे. यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. माधव कदम, धनराज पाटील, कवी, साहित्यिक अभिषेक राजपूत, मनोज गायकवाड, किशोर थोरात, संगीतप्रेमी दिपक पाल, प्रेस फोटोग्राफर नितीन पाटील, दीपक चौधरी, कलावंत विजय पवार हे परिश्रम घेत आहेत. कलाकार धनराज पाटील हे आपल्या कुंचल्यांनी आशाताई भोसले यांचे चित्र रेखाटून आगळा वेगळा प्रयोग करणार आहेत. सर्व रसिकांनी श्रॉफ हायस्कूलच्या प्रांगणात ९ मे रोजी सायंकाळी ६ वाजता उपस्थित राहून आशाताईंच्या सुरेल गीतांच्या मेजवानीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. या कार्यक्रमात प्रतिभा कुळकर्णी, वंदना चित्ते, राज जमीनदार, चंपालाल पटेल, संजय मोरे, विजयकुमार अजमेरा, रचना निकम, अनिता सोमवंशी, मिनल म्हसावदकर, दिप्ती शिवदे, मनिषा माळी, राकेश कलाल, रवी सुर्यवंशी आदी कलावंत गीतांतून आशाताई भोसले यांना आदरांजली वाहणार आहे.

# रवंजे बु.येथील राहत्या घरासमोरील स्वच्छतागृह हटवा

## सुनिता चव्हाण यांची जि.प.मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांकडे मागणी

प्रतिनिधी । एरंडोल

**तालुक्यातील रवंजे बु.येथील सुनिता हिरामण चव्हाण यांच्या रहत्या घरासमोरील अनधिकृत स्वच्छतागृह व शेणाचे ऊकिरडे तात्काळ हटवा, अशी मागणी चव्हाण यांनी जि.प.मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

रवंजे बु.येथील सुनिता हिरामण चव्हाण यांचे घर नंबर ४२२/१ या रहत्या घरासमोर ग्रा.पं.ने सर्व नियम धाब्यावर बसवून व जिल्हा परिषद अंतर्गत ग्रा.पं.विभागाचे लेखी आदेशाकडे दुर्लक्ष करीत तत्कालीन सरपंच व ग्रामसेवकांनी ५६ दिवसआधी पदावर नियुक्ती झालेली नसतांनाही ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन गंभीर गुन्हा केला आहे. स्वच्छतागृह दुरुस्तीचे तांत्रिक मान्यता नसतांना जाणुनबुजून घरासमोर नविन मुतारी बांधून टाकली आहे. विशेष म्हणजे संबंधित शाखा अभियंता यांचेकडून कोणतेही लाईनआऊट घेतलेली नाही व त्यांना सुचितही केलेले नाही व मोजमाप पुस्तकात मोजमापे नोंदी घेतलेल्या नाहीत. तत्कालिन जनमाहिती अधिकारी तथा सहा गटविकास अधिकारी पंचायत समिती एरंडोल यांनी व विस्तार अधिकारी (आरोग्य) व एरंडोल पं.स.शाखा अभियंता यांनी गावी प्रत्यक्ष भेट देऊन स्वयंस्पस्ट चौकशी अहवाल माहितीच्या अधिकारात दि. २० जानेवारी २०१९ रोजी गटविकास अधिकारी पं.स.एरंडोल यांना कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे.तसेच अर्जदारांनाही सविस्तर अहवालाची प्रत दिलेली आहे. तेव्हापासून व मध्यंतरी कोरोनाच्या काळात पं.स.कडून काहीही कार्यवाही केलेली नाही. यानंतर अर्जदार यांनी जिल्हाधिकारी जळगाव यांचेकडे लोकशाही दिनी जि.प. ग्रा.पं. विभाग, पंचायत समिती एरंडोल व रवंजे बु.ग्रामपंचायतीकडे वारंवार लेखी निवेदने दिलेली आहेत. दि.१२ सप्टेंबर २०१९ रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती एरंडोलचे जनमाहिती अधिकारी तथा सहा गटविकास अधिकारी डी.बी.सुरवाडे यांनी सदर स्वच्छतागृहात अनियमितता असल्याचा सविस्तर लेखी अहवाल सादर केलेला असतांनाही पंचायत समितीने मुतारी पाडण्याचे आदेश काढलेले नाहीत. संबंधित अर्जदार व त्यांचे कुटुंब घराजवळील घाणीचे साम्राज्य व डासांमुळे वारंवार गंभीर आजारांनी त्रस्त होत आहेत. या त्रासाला कंटाळून अनधिकृत स्वच्छतागृह व शेणाचे ऊकिरडे हटविण्याबाबत आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. सात दिवसात अहवाल मुख्यकार्यकारी अधिकारी जळगांव कार्यालयास मागितला आहे.

याबाबत रवंजे येथील सरपंच, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी यांचेशी संपर्क साधला असता ते नेहमीप्रमाणे उडवाऊडवीची उत्तरे देत असतात. सदरचे स्वच्छतागृह व शेणाचे ऊकिरडे व अतिक्रमण न हटविल्यास व घरासमोरील सरपंचने सांडपाण्याचा काढून नेलेला पाईप न बसविल्यास व स्वच्छता न केल्यास न्यायासाठी लोकशाहीमार्गाने आमरण उपोषण करण्याचा इशारा अर्जदार यांनी दिला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

- १९५९ : कर्मवीर भाऊराव पाटील यांचा स्मृतिदिन.
- १३३८ : थोर विठ्ठलभक्त संत चोखामेळा यांचे मंगळवेढा येथे निधन.
- १५४० : मेवाडचा प्रसिध्द वीरपुरुष राणा प्रतापसिंह यांचा जन्मदिन.
- १८७४ : मुंबईत प्रथम घोड्यांची ट्राम सुरू झाली.
- १९८६ : जगात सर्वप्रथम एव्हरेस्ट शिखर सर करणारा धाडसी गिर्यारोहक शेर्पा तेनसिंग यांचे निधन.

# यंदाही मुलींनीच मारली बाजी

प्रतिनिधी । जळगाव

*राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेचा निकाल दि. ८ मे रोजी जाहीर झाला आहे. यंदा देखील या निकालात मुलींनी बाजी मारल्याचे दिसून येत आहे. तसेच जळगाव जिल्ह्यातही मुलींचा डंका वाजला आहे. यंदा दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्चदरम्यान घेण्यात आली होती. इयत्ता १०वीचा निकाला आज ऑनलाईन जाहीर झाला आहे.*

## जय योगेश्वर माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा ९८.६०% निकाल



**अमळनेर ।** येथील जय योगेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या एस एस सी बोर्ड परीक्षा मार्च-२०२६ चा निकाल ९८.६० टक्के लागला असून एकूण ९४ विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते.

इ.१० वीच्या परिक्षेत जयेश दतू कोळी याने ९४ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, दीपक सुनील पारधी याने ९३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर नैतिक केशवराव पाटील याने ९०.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला आहे.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब डी. डी. पाटील ,उपाध्यक्ष तथा प्राचार्य रावसाहेब के.डी पाटील , सचिव राधेश्याम पाटील ,खजिनदार दादासो.शैलेंद्र दत्तात्रेय पाटील , संचालिका प्रा डॉ. नयना कैलास पाटील, संचालक बापूसो नंदकुमार डी. पाटील व सर्व संचालक मंडळाने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## जि.प.विद्यानिकेतन विद्यालयाचा ६२% निकाल

जळगाव जिल्हा परिषद विद्यानिकेतन विद्यालयाचा ६२% निकाल लागला असून शाळेत प्रथम क्रमांक राधिका जितेंद्र वारूळकर (६०.४०%), द्वितिय गौरव शरद गावडे (५८.८०%), तृतिय पायल दिलिप जिरे (५६.६०%) गुण मिळवून यश संपादन केले आहे.

यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे प्राचार्या सुनिता गरुड, शिक्षिका मनिषा चौधरी, के.सी.पाटील, कार्यालयीन प्रमुख संजय सोनवणे, श्री. कानडे व सर्व शिक्षकवृंदानी कौतुक केले.



## प्रोग्रेसिव्ह शाळेची १००% निकालाची परंपरा कायम



जळगाव येथील विद्यावर्धिनी शिक्षण संस्था संचलित प्रोग्रेसिव्ह शाळेचा इयत्ता दहावी परीक्षेचा शंभर टक्के निकाल लागला आहे. यशाची परंपरा कायम राखत एकूण ७२ विद्यार्थ्यांपैकी सहा विद्यार्थी ९०%, ३५ विद्यार्थी ७५ टक्के २२ विद्यार्थी ६०% वर गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्राविण्य मिळवणारे विद्यार्थी अनुक्रमे जानवी विजय प्रजापती ९३.८० टक्केमिळवून प्रथम तर द्वितीय कुणाल जितेंद्र जाखेटे ९२.४० टक्के, स्वप्नील पाटील ९१.६० टक्के गुण मिळवून तृतीय आणि स्नेहा किरण पाटील ९१ टक्के चतुर्थ, तर धनश्री सुरेश पांडे ९०.६० टक्के, अनुराधा सुनील पाटील ९०.६० गुण मिळवत विशेष प्राविण्य मिळवले आहे. यासाठी श्रद्धा दुनाखे, गणेश तायडे, सुनिता नारखेडे, दीपाली वैद्य, प्रतिभा वाणी या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे यश पाहून शिक्षक-पालक यांच्यात समाधानाचे वातावरण दिसून आले. याप्रसंगी संस्थेची व्यवस्थापन समिती यांनी शिक्षक-विद्यार्थी यांना शुभेच्छा देत विशेष कौतुक केले.

## थोडक्यात


### बहिणाबाई विद्यालयाचा ८९.५८% निकाल

**जळगाव ।** बहिणाबाई माध्यमिक विद्यालयाचा शालांत परीक्षेचा निकाल ८९.५८% इतका लागलेला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवलेले आहे. त्यात प्रथम विघ्नेश लोहार ८२% द्वितीय शिवानी गोसावी ७२ ८५ तृतीय ओम पाठक ७२.६०असून यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बंदुदादा काळे.सचिव लीलाधर नारखेडे, कार्याध्यक्ष जनार्दन रोटे, समन्वयक प्रतिभा खडके, मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांनी अभिनंदन केले आहे.

### बायोमेडिकल वेस्ट टाकणाऱ्यावर मनपाची कारवाई

**जळगाव ।** शहरातील जुन्या हायवे परिसरातील नाल्यांच्या सफाईदरम्यान बायोमेडिकल वेस्ट उघडपणे नाल्यात टाकल्याचा धक्कादायक प्रकार बुधवारी उघडकीस आला. या प्रकरणी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने डॉ. दिगंबर पाटील यांच्या रुग्णालयावर ५ हजार रुपयांचा दंडात्मक कारवाई केली आहे. पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाई सुरू असताना मनपाचे स्वच्छता कर्मचारी जुन्या हायवे परिसरातील नाल्यातील गाळ आणि कचरा काढत होते. यावेळी नाल्यात मोठ्या प्रमाणात वैद्यकीय कचरा आढळून आला. या कचऱ्यात वापरलेल्या सिरिंज, सलाईनच्या रिकाम्या बाटल्या, अर्धवट वापरलेली औषधे तसेच गंभीर आजारांच्या उपचारासाठी वापरण्यात येणाऱ्या इंजेक्शनचा समावेश होता. रुग्णालयांवर कठोर कारवाईचा इशाराही मनपा प्रशासनाने दिला आहे.

## असोदा सार्वजनिक विद्यालयात मोहिनी पाटील प्रथम



असोदा येथील सार्वजनिक विद्यालयाचा ५९.६८ टक्के निकाल लागला असून विद्यालयात पहिले पाच क्रमांक विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले आहे.

प्रथम क्रमांक पाटील मोहिनी भरत ९० टक्के, द्वितीय नारखेडे कोमल प्रवीण ८८.६०, तृतीय कासार कोमल प्रकाश ८०.६०, चतुर्थ पाटील यज्ञिका खेमचंद ७९.८०, घुले संजीवनी विजय ७७.६० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक प्राप्त केला आहे.

संस्थेचे अध्यक्ष अनिल महाजन, सचिव विलास चौधरी, चेअरमन डी. यू.भोळे, संचालक मंडळ, मुख्याध्यापक डॉ.मिलिंद बागुल, पर्यवेक्षक एल.जे.पाटील यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,पालक यांनी यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थिनीचे अभिनंदन केले आहे.

## १० वी परीक्षेत गो.से. हायस्कूलचे उत्तुंग यश

**पाचोरा :** पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित श्री. गो.से.हायस्कूलने एसएससी परीक्षेत विद्यालयाचा ८७.२०% निकाल लागला आहे. विद्यालयातील प्रविष्ट झालेले ४६१ विद्यार्थ्यांपैकी ४०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ८१ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे. प्रथम पाच विद्यार्थी मध्ये प्रथम ललित बळवंत आंबेकर ९४.६, द्वितीय हर्षल शैलेंद्र चौधरी ९३.४०, तृतीय मोहित गणेश पाटील ९२, चतुर्थ स्वरूप अशोक राठोड ९१, पाचवा खुशी मनोहर सोनवणे ९० टक्के. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी आ. दिलीप वाघ, चेअरमन संजय वाघ, मानस सचिव महेश देशमुख, व्हॉइस चेअरमन व्ही.टी.जोशी, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## हातेड शिवाजी हायस्कूलचा ६४ टक्के निकाल



**चोपडा :** तालुक्यातील हातेड येथील श्री.शिवाजी हायस्कूल, हातेड या विद्यालयाचा इ १० वीचा निकाल ६४.७० टक्के लागला असून विद्यालयातून कुमारी तनुश्री प्रवीण सोनवणे तिने शेकडा ८५.६० टक्के गुण मिळत विद्यालयातून प्रथम येण्याच्या मान मिळवला आहे.

या विद्यालयातील विद्यार्थिनी कु.मानसी कैलास सनेर हिने शेकडा ७५.८० टक्के गुण मिळवाल द्वितीय क्रमांकावर बाजी मारले आहे तर कु.कोमल प्रशांत सोनवणे ७५.०० टक्के गुण मिळवत तृतीय आली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे मानद सचिव निलेश भोईटे, संचालक मंडळ स्कूलकमेटी चेअरमन ॲड. सुरेश आनंदराव सोनवणे, मुख्याध्यापक पी.सी. पाटील, पर्यवेक्षक पी.आर.पाटील तसेच एम.पी. सांगळे , एम.आर. पाटील, जी. बी.पाटील, आर. एल.तायडे, के.आर.पाटील, एस.आर.शिंदे, संचालक मंडळ, सर्व शिक्षक बंधू, भगिनी व पालकांनी अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## नरसापूर बालिका अत्याचार घटनेचा पाचोरा शिवसेनेतर्फे निषेध

प्रतिनिधी । पाचोरा

**पुणे जिल्ह्यातील नरसापूर येथे निष्पाप तीन वर्षीय चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचार व तिच्या हत्येच्या घटनेने पाचोरा तालुक्यातुन तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या क्रूर घटनेच्या निषेधार्थ पाचोरा तालुका शिवसेना महिला आघाडीच्या वतीने या घटनेतील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.**




या आंदोलनात शिवसेना पाचोरा तालुका महिला आघाडीच्या पदाधिकारी सहभागी झाल्या होत्या. यावेळी पाचोरा उपविभागीय अधिकारी भुषण अहिरे, तहसीलदार विजय बनसोडे, पोलीस निरीक्षक राहुल पवार यांना शिवसेना पाचोरा तालुका महिला आघाडीच्यावतीने जिल्हाप्रमुख ललिता पाटील, उपजिल्हाप्रमुख वंदनाताई पाटील, मंदाताई पाटील, उपजिल्हा समन्वयक बेबाताई पाटील, उपजिल्हा संघटक जयश्री येवले, शहर प्रमुख मंदाकिनी पारोचे, अनिता पाटील, नगरसेविका वर्षाताई ब्राह्मणे, मनीषाताई बाविस्कर यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले. या निवेदनात या अमानुष घटनेचा तीव्र निषेध नोंदवित आरोपीवर कठोरातील कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. या प्रकरणाचा निष्पक्ष तपास करण्यासाठी स्वतंत्र विशेष तपास पथक नेमण्यात यावे. जलद गती न्यायालयात खटला चालून आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

## बर्ड फ्लूचा धोका टाळण्यासाठी जळगाव मनपा सतर्क

प्रतिनिधी । जळगाव

**नवापूर परिसरात पोल्ट्री फार्ममध्ये बर्ड फ्लूचा संसर्ग वेगाने वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जळगाव शहराच्या सुरक्षिततेसाठी उपमहापौर मनोज चौधरी यांनी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाची तातडीची आढावा बैठक घेतली. शहरात कोणत्याही प्रकारचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.**

या बैठकीत उपमहापौरांनी शहरातील सर्व चिकन दुकाने, मांस विक्री केंद्रे आणि पोल्ट्री फार्मचे विशेष सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच बाहेरील जिल्ह्यांतून विशेषतः नवापूरसारख्या बाधित भागातून येणाऱ्या पोल्ट्री वाहनांची कडक तपासणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. संशयास्पद परिस्थिती हाताळण्यासाठी आरोग्य विभागाची विशेष पथके तैनात करण्यात आली असून, मृत किंवा आजारी पक्षी आढळल्यास त्यांची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे आदेश दिले आहेत.

**स्वच्छता व निर्जंतुकीकरण**

चिकन मार्केट व कत्तलखान्यांमध्ये नियमित फवारणी आणि सॅनिटायझेशन करण्याच्या सूचना आरोग्य विभागाला देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि मांस किंवा अंडी पूर्णपणे शिजवूनच सेवन करावी, याबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. शहरातील आरोग्य केंद्रांना आवश्यक औषधसाठा आणि सुरक्षा साहित्य उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असून, श्वसनाचे त्रास असलेल्या रुग्णांवर विशेष लक्ष देण्यास सांगितले आहे.

## जनहित याचिकेवर उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय; शेतकऱ्यांना दिलासा

प्रतिनिधी । अमळनेर

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शेतमालाचा उत्पादनाचा वास्तविक खर्च विचारात घेऊन १५ % नफ्याची आकारणी करत केंद्र शासनाकडे शेतमाल खरेदीबाबत किमान आधारभूत दर जाहीर करण्यासाठी शिफारस करण्याचे काम राज्य कृषी मूल्य आयोगाने करणेची यंत्रणा आज रोजी अस्तित्वात आहे. जनहित याचिकेवर उच्च न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय दिल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.**

तथापि प्रत्यक्षात केंद्र शासनाकडून जाहीर करण्यात येणारे शेतमालाचे किमान आधारभूत दर हे राज्य कृषी मूल्य आयोगाच्या शिफारस दरापेक्षा सुमारे ३० ते ४० टक्के कमी आहेत. परिणामी शेतकऱ्यांना उत्पादन खर्चापेक्षा कमी दरात त्यांचा शेतमाल विकावा लागत असल्याने महाराष्ट्रातील शेतकरी कर्जबाजारी झाल्याने नैराश्यतेपोटी आत्महत्या करीत असल्याची बाब विचारात घेत राज्य कृषी मूल्य आयोगाने शिफारस केलेले दर व केंद्र शासनाने जाहीर केलेले किमान आधारभूत दर यातील फरकाची रक्कम राज्य शासनाच्या दि.२३ एप्रिल २०१५ रोजीच्या आदेशातील नमूद कलम १७ अन्वये शेतकऱ्यांना अदा करावी, अशी मागणी सत्यशोधक समाज संघाचे विश्वस्त व गावरानी जागल्या सेना अध्यक्ष सत्यशोधक विश्वासराव पाटील रा. जानवे यांनी मोहनिश थोरात यांच्यामार्फत सार्वजनिक जनहित याचिका क्र. ८८/२०२४ अन्वये उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केली होती.

सदर जनहित याचिके बाबत अर्जदाराचे म्हणणे ग्राह्य धरत न्या. विभा कंकणवाडी व न्या. अजित बी. कडेठणकर यांनी दि.७ मे २०२६ रोजी केंद्र व राज्य शासनाच्या दरातील फरकाचे बारकाईने परीक्षण करून शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईबाबत दि. २५ एप्रिल २०१५ रोजीच्या शासन आदेशाची पूर्तता करत शेतकऱ्यांना न्याय देणेसह सकारात्मक प्रयत्न करणेची बाब नमूद असलेला ऐतिहासिक आदेश पारित करून जनहित याचिका निकाली काढलेली आहे. सदरील ऐतिहासिक आदेशामुळे शेतकऱ्यांवरील अन्याय थांबविणेसाठी सत्यशोधक समाज संघाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक करत अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# सुप्रिम कॉलनीत मूलभूत सुविधांचा अभाव

## रस्त्यासह विविध मागण्यांचे महापालिका आयुक्तांना मनसेचे निवेदन

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहरातील औद्योगिक वसाहतीलगत असलेल्या सुप्रीम कॉलनी परिसरातील रस्त्यांची अत्यंत बिकट अवस्था गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहे. याकडे महानगरपालिकेचे होत असलेले दुर्लक्ष नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण करणारे ठरत आहे. शहरात कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांच्या घोषणा होत असताना सुप्रीम कॉलनी परिसर मात्र आजही मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे वास्तव आहे.**




शहरातील सुप्रीम कॉलनी रिक्षा स्टॉप ते सागर अपार्टमेंट, सागर अपार्टमेंट (गीतांजली केमिकल) ते कृष्णानगर मागील परिसर या रस्त्यांवर सात ते आठ वर्षांपूर्वी केवळ खडी टाकून कच्च्या स्वरूपात काम करण्यात आले होते. मात्र त्यानंतर ना डांबरीकरण करण्यात आले, ना कोणतीही मजबुतीकरणाची प्रक्रिया राबविण्यात आली. परिणामी रस्त्यांवर मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून नागरिकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात चिखल आणि उन्हाळ्यात धुळीचे साम्राज्य अशी परिस्थिती निर्माण होत असून परिसरातील नागरिकांचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे.रस्ता, स्वच्छता आणि सुरक्षित प्रवास या कोणत्याही प्रशासनाकडून नागरिकांना मिळणे अपेक्षित असलेल्या मूलभूत सुविधा आहेत. मग महानगरपालिकेला नियमित कर भरणाऱ्या नागरिकांनी मूलभूत सुविधा मागायच्या नाहीत का? कर भरायचा नागरिकांनी आणि बदल्यात खड्डे, धूळ आणि त्रास सहन करायचा, हीच का शहर विकासाची व्याख्या? असा संतप्त सवाल उपस्थित करीत नागरिकांच्या या व्यथा लक्षात घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात मागण्यांचे निवेदन अप्पर आयुक्तांना देण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, उपमहानगराध्यक्ष ललित शर्मा, महिला शाखाध्यक्ष अनिता कापुरे, लक्ष्मी भील, शाखाध्यक्ष युसूफ खाटीक, राहुल चव्हाण, खुशाल ठाकूर, राजेश मराठे उपस्थित होते.

## प्रताप विद्यामंदिर शाळेची यशाची उज्ज्वल परंपरा कायम

प्रतिनिधी । चोपडा

**येथील प्रताप विद्या मंदिराच्या माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी एसएससी मार्च २०२६ परीक्षेत उत्तम गुण मिळवून उत्तुंग यश संपादन करत विद्यालयाच्या यशाची परंपरा कायम ठेवली आहे.**



शाळेचा एकूण निकाल ९७.३६ टक्के लागला असून सेमी इंग्रजी विभागाचा निकाल ९७.५४ टक्के, तर उर्दू विभागाचा निकाल ९६.२९टक्के लागला आहे. टेक्निकल विभागाचा निकाल १०० टक्के लागला आहे. कु.यशश्री विश्वनाथ चव्हाण या विद्यार्थिनीने ९७.६० टक्के गुण मिळवत शाळेतून तसेच मुलींमधून प्रथम क्रमांक पटकावला आहे तर चि.जय राजेश लोहार आणि चि.सचिन योगेश शिंपी या विद्यार्थ्यांनी प्रत्येकी ९७ टक्के गुण मिळवत मुलांमधून प्रथम क्रमांक पटकावला आहे. उर्दू विभागातील जोया एजाज पठाण हिने ९२.२० टक्के गुण मिळवत उर्दू विभागातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. शाळेतून ३१ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करत भरघोस यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल चोपडा एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष शैलाबेन मयूर, उपाध्यक्ष विश्वनाथ अग्रवाल, चेअरमन राजाभाई मयूर, सचिव माधुरी मयूर, कार्यकारणी सदस्य उर्मिलाबेन गुजराथी, चंद्रहासभाई गुजराथी, भूपेंद्रभाई गुजराथी, रमेश जैन, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका एम.डब्लू.पाटील, उपमुख्याध्यापक ए.एन.भट, उपप्राचार्य जे एस शेलार, पर्यवेक्षक एस.व्ही. करमरकर, पी.एन.नागपुरे, एन एम राजपूत, समन्वयक गोविंदभाई गुजराथी, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# चोपडा विवेकानंद विद्यालयाची स्वरा हरताळकरने रोवला मानाचा तुरा

## १०० टक्के गुण मिळवत जिल्ह्यात आली प्रथम ! २३ विद्यार्थी ९० टक्क्यांच्या पार

प्रतिनिधी । चोपडा

**येथील विवेकानंद विद्यालयाचा दहावीचा एकूण निकाल ९९.२८% लागला असून कु. स्वरा विनीत हरताळकर हिने १००% गुण मिळवून विद्यालयाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नाव कोरले आहे. स्वरा ही केवळ विद्यालयातच नव्हे, तर संपूर्ण जळगाव जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. स्वराच्या या ऐतिहासिक यशासोबतच इतर विद्यार्थ्यांनीही दैदिप्यमान कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**







### लाडक्या लेकीच्या यशाने पालक भारावले

**विवेकानंद विद्यालयाच्या इतिहासात प्रथमच एखाद्या विद्यार्थ्याने १००% गुणांचा टप्पा गाठल्याने संपूर्ण चोपडा शहरात आनंदाचे भरते आले आहे. आपल्या लाडक्या लेकीच्या या ऐतिहासिक यशाने पालकांचे मन अभिमानाने भरून आलेआहे. आम्ही पाहिलेल्या स्वप्नाच्या दिशेने आज स्वराने पहिले पाऊल टाकले आहे. तिच्या कष्टाचे आज चीज झाले असून, तिने मिळवलेल्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे, अशी कृतज्ञतापूर्ण भावना विनीत हरताळकर व आजोबा डॉ. विकास हरताळकर यांनी यावेळी व्यक्त केली.**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेचा निकाल दि. ८ मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला आहे. यंदा देखील या निकालात मुलीच बाजीगर ठरल्या आहे. चोपडा येथील विवेकानंद विद्यालयातील कु.स्वरा विनीत हरताळकर १००% गुण मिळवून विद्यालयासह जिल्ह्यात प्रथम तर सानवी अतुल पाटील: ९७.८०%द्वितीय, हर्षल भरत पाटील: ९७.६०% व ऋतुजा किशोर पाटील ९७.६०% तृतीय तर सोहम हितेश जैन: ९७% टक्के गुण मिळवत चतुर्थ क्रमांक पटकावला आहे.

जिद्द, चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर शून्यातून विश्व निर्माण करता येते, याची प्रचिती चोपडा येथील विवेकानंद विद्यालयाच्या निकालाने दिली आहे. नुकत्याच ऑनलाइन जाहीर झालेल्या माध्यमिक शालांत (एसएससी) परीक्षेच्या निकालात कु. स्वरा विनीत हरताळकर हिने १००% गुण मिळवून विद्यालयाच्या इतिहासात गुणवत्तेचा झेंडा फडकवला आहे.

**गुणवत्तेची परंपरा कायम**

विवेकानंद विद्यालयाचे २३ विद्यार्थी ९० टक्क्यांच्या पार आहे. स्वरा हरताळकर हिच्यासह शाळेतील इतर विद्यार्थ्यांनीही आपल्या यशाची परंपरा दिमाखात कायम ठेवली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९९.२८% लागला असून, तब्बल २३ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून गुणवत्तेची बाजी मारली आहे.

**कौतुकाचा वर्षाव**

विद्यार्थ्यांची अहोरात्र मेहनत, पालकांचे व शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यांचा हा परिपाक आहे, असे गौरवोद्गार शाळेच्या वतीने काढण्यात आले. मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. स्वराची ही यशोगाथा तालुक्यातील इतर विद्यार्थ्यांसाठी येणाऱ्या काळात नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे.

या अभूतपूर्व यशाबद्दल संस्थेचे विद्यमान अध्यक्ष डॉ. विकास हरताळकर, माजी अध्यक्ष डॉ. विजय पोतदार, उपाध्यक्ष घनश्यामभाई अग्रवाल, सचिव ॲड. रवींद्र जैन, सहसचिव डॉ. विनीत हरताळकर आणि सर्व विश्वस्तांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच विश्वस्त व मुख्याध्यापक नरेंद्र भावे, पवन लाठी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका आशा चित्ते, संजय सोनवणे, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य पी.जी. पाटील, इंग्रजी माध्यमाच्या प्राचार्या भारती पंजाबी, गौरी शुक्ल, बालवाडी विभागाच्या मुख्याध्यापिका रेवती दीक्षित व योगिता केंगे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## थोडक्यात

### सांगवी येथील कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या



**पारोळा ।** तालुक्यातील सांगवी येथील रवींद्र उर्फ नाना बाबुराव पाटील (वय ५०) या शेतकऱ्याने दरवर्षी निसर्गानं घातलेले थैमान, होणारा अमाप खर्च आणि येणारं उत्पन्न कमी आल्याने दरवर्षी वादळ, अवकाळी पाऊस असे संकट येऊन कर्जबाजारी झालो, असे मनात धरून खडके तालुका एरंडोल येथे सासरवाडीला त्यांच्या शेतात जाऊन १ मे रोजी दुपारी १ वाजता विष प्राशन करून घेतले. तेथील आजूबाजूच्या शेतकऱ्यांच लक्ष गेल्याने त्यांनी तात्काळ कल्पना हॉस्पिटल एरंडोल येथे त्यांना उपचारासाठी नेले. तेथे प्राथमिक उपचार करत असताना अतिप्रमाणात विष घेतल्यामुळे तेथून पारोळा येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोन दिवस तेथे उपचार चालू असताना अचानक प्रकृती खालावली. तेथून जळगाव येथे रुग्णवाहिकेतून शासकीय मेडिकल कॉलेज येथे दाखल केले. आज दि. ७ मे रोजी त्यांची प्राणजोत मालावली. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नात असा परिवार सांगवी येथे आहे. राहुल रवींद्र पाटील यांचे ते वडील होत, अशी माहिती सांगवीचे माजी सरपंच प्रवीण पाटील यांनी दिली.

## शाळेच्या नूतनीकरणासाठी माजी विद्यार्थ्यांची ११ लाखांची देणगी

प्रतिनिधी । भालोद, ता.यावल

**येथील न्यू इंग्लिश स्कूल ही शंभरी गाठलेली शाळा असून या शाळेच्या नूतनीकरणासाठी आ. अमोल जावळेसह शाळेचे संचालक मंडळ प्रयत्नशील आहेत. यासाठी माजी विद्यार्थ्यांना मदतीचे आवाहन केल्याने त्यास प्रतिसाद देत आपण शिकलेल्या शाळेबद्दल ऋण फ ेडण्यासाठी शाळेच्या विकासात हातभार लावून शाळेचे रूप पालटण्यासाठी माजी विद्यार्थी मदतीचा हात पुढे करत आहेत.**



या कामासाठी योगदान देणारे मुंबई येथील उद्योजक तथा शाळेच माजी विद्यार्थी मधुकर चौधरी व उद्योजक मेघःश्याम चौधरी या दात्यांचा संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात सत्कार करण्यात आला आहे. नवी मुंबई येथील भूमीजा कलरंट प्रा.लि. या कंपनीचे संचालक मधुकर चौधरी यांनी कंपनीच्या सीएसआर फंडातून आपल्या मातोश्री कै. गिरिजाबाई चौधरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १ लाख ११ हजार १११ रुपये तर.तर रेनबो इंडस्ट्रीजचे संचालक मेघश्याम भादू चौधरी यांनी आपले वडील कै. भादू चुडामण चौधरी यांच्या स्मृती प्रित्यर्थ दोन लाख एक्कावन्न हजार रुपये देणगीचा धनादेश संस्थेला देत माजी विद्यार्थी म्हणून या कामात योगदान दिले. या दात्रुत्वाबद्दल संस्थेच्या वतीने संचालक मंडळाच्या हस्ते त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. प्रसंगी दात्यांनी दिलेल्या पैशांचा सदुपयोग हा शाळा इमारतीच्या नूतनी करण्यासाठी केला जाईल, असे चेअरमन हेमलता इंगळे यांनी सांगितले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष गणेश नेहेते, उपाध्यक्ष जी.डी. चौधरी, चेअरमन हेमलता इंगळे, व्हा.चेअरमन नारायण चौधरी, सचिव भास्कर पिंपळे, माजी अध्यक्ष संस्थेचे सर्व संचालक उपस्थित होते.

## अमळनेरचा पाणीप्रश्न तात्पुरता मार्गी, पाणी संकट टळले

प्रतिनिधी । अमळनेर

**जळोद-कलाली पाणीपुरवठा योजनेतील जलस्तर मोठ्याप्रमाणात खालावल्याने शहरात पाणीटंचाईची शक्यता निर्माण झाली होती. मात्र तापी नदीपात्रात पुन्हा पाणी उपलब्ध झाल्याने पुढील काही दिवसांसाठी शहराचा पाणीप्रश्न तात्पुरता मार्गी लागला आहे.**

दरम्यान, अनोरेदे परिसरात उभारण्यात आलेल्या अवैध बंधारा व रस्त्यामुळे नदीतील पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडथळीत झाला होता. याबाबत माहिती मिळताच नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी उपाध्यक्ष प्रशांत निकम यांना तहसीलदार, मंडळ अधिकारी व संबंधित प्रशासनाशी समन्वय साधून तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.



प्रशासनाने त्वरित हालचाल करत अवैध बंधारा आणि रस्ता हटवून नदीतील पाण्याचा प्रवाह पूर्ववत सुरू केला. यानंतर उपाध्यक्ष, पाणीपुरवठा सभापती तसेच नगरसेवकांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. तसेच जळोद येथील नदीपात्रात पाणी साठवण्यासाठी तात्पुरता बंधारा उभारण्याच्या सूचनाही नगराध्यक्षांनी दिल्या.

सध्या मे महिन्यात प्रथमच जळोद येथील दोन्ही पंप पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात आले असून कलाली डोह सुरू करण्याची आवश्यकता भासलेली नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## राष्ट्रीय मानवाधिकार, भ्रष्टाचार विरोधी सामाजिक न्याय फाउंडेशनचा पदाधिकारी सन्मान सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । अमळनेर

**राष्ट्रीय मानवाधिकार आणि भ्रष्टाचार विरोधी सामाजिक न्याय फाउंडेशनच्या वतीने गुरुवार, दिनांक ७ मे २०२६ रोजी अमळनेर येथे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**

या कार्यक्रमात नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांना अधिकृत ओळखपत्र (आयडी कार्ड), बॅच तसेच नियुक्तीपत्रांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अशोकजी पवार, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री. प्रफुल पाटील, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष श्री. ईश्वर पाटील तसेच महाराष्ट्र राज्य





महिला अध्यक्ष सौ. प्रा. मंदाकिनी भामरे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून संघटनेच्या सामाजिक कार्याची दिशा स्पष्ट करत पदाधिकाऱ्यांना समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.

यावेळी अमळनेर येथील राजगड निवासस्थानी आयोजित बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांनी संघटनेची ध्येयधोरणे जाणून घेत समाजसेवेचा संकल्प केला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## साकळी येथे मेंढपाळांकडून केळी बागेचे नुकसान

प्रतिनिधी । साकळी

**येथील शेतशिवारातील एका शेतात एका मेंढपाळाने चक्क केळीचे घड कापून मेंढ्यांना खाऊ घालत असल्याचे शेतकऱ्यांच्या निदर्शनास आले. हा शेतकरी नुकसानीचा धक्कादायक प्रकार पाहून संबंधित प्रकारास जबाबदार असलेल्या पीक संरक्षण सोसायटीचे नाव बदलून पीक नुकसान सोसायटी ठेवले पाहिजे, असा संतप्त सवाल शेतकरी वर्गाकडून व्यक्त केल्या जात आहे.**



साकळी पीक संरक्षण सोसायटीकडून सोसायटीच्या हद्दीतील जे जंगल आहे. ते जंगल चराईसाठी दरवर्षी बाहेरगावच्या मेंढपाळांना दिले जाते व सोसायटीने घालून दिलेल्या नियमानुसार या मेंढपाळांना कुणाच्याही शेतातील उभ्या पिकात मेंढ्या चराईसाठी प्रतिबंध असतो. मात्र मेंढपाळ आपली दादागिरी करून शेतातल्या उभ्या पिकात मेंढ्या व ढोरे घालून त्यांना पिके खाऊ घालतात. यामुळे संबंधीत शेतकऱ्यांना मोठे नुकसान होत असते. याबाबत सोसायटीकडे तक्रार केली असता सोसायटी नावापुरता कारवाई करते. पुन्हा हे प्रकार 'जैसे थे' प्रमाणे होत असतात. या कारवाईमध्ये आम्ही मारल्यासारखे करतो, तुम्ही रडल्यासारखे करा, अशी थातुरमातुर कारवाई केली जाते. या कारवाईला काहीच अर्थ नसतो. येथील शेतकरी राजू भगवान मराठे यांच्या आडीवाट शिवारातील शेतात उभ्या केळी पिकाचे घड कापून मेंढ्यांना खायला देत असल्याचे शेतकऱ्याच्या निदर्शनास आले. हा प्रकार पाहून शेतकरी ही हताश झाला होता. नुकसान करणारे प्रकार वारंवार घडत असतील तर मग या प्रकाराकडे कोण लक्ष देणार? बाहेरगावावरून आलेल्या मेंढपाळांची दादागिरी केव्हा कमी होणार? या मेंढपाळांवर कोणती कडक होणार?असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांकडून व्यक्त केले जात आहे.

## प.पू. प्रमोदमुनीजी यांचे वाकोद येथे प्रवचन

प्रतिनिधी । जामनेर

प.पू. आचार्य भगवंत १००८ श्री हिराचंद्रजी म.सा. भावी आचार्य प.पू. महेंद्र मुनी जी म. सा. यांचे अज्ञानुवर्ती तत्त्वचिंतक प.पू. प्रमोदमुनी जी आदिठाणा ३, महासतीजी प.पू. विमलेशप्रभाजी म.सा. आदि ठाणा ११ यांचा वाकोद विहार झाला.

यावेळी वाकोद जैन फार्म येथे सुख सातापूर्वक विराजमान झाले. यावेळी प.पू. प्रमोद मुनी यांच्या प्रवचनाचा लाभ श्रावक श्राविकांनी घेतला. यावेळी जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, माजी महापौर प्रदीप रायसोनी, अतुल जैन, ज्योती जैन, नयनतारा बाफना, अभय जैन, अविनाश जैन, सुरेश जैन, नगरसेवक अमर जैन, सचेत जैन, नंदलाल गादीया, सुनील जैन रुपेश लुंकड, नितीन चोपडा, संदीप रेदासनी, रमण छाजेड, गणेश कर्नावट, नरेंद्र जैन, यांच्यासह जळगाव येथून ४० हून अधिक श्रावक-श्राविका उपस्थित होते. यावेळी प.पू. प्रमोदमुनी यांचे मंगल प्रवचन झाले.

आध्यात्मिक वा व्यक्तीगत जीवनात यशस्वी होण्यासाठी सेवा, त्याग आणि प्रेम ही त्रीसुत्री उपयोगी पडते. शांती प्राप्त करण्यासाठी साधना आवश्यक असते. हिंदू, जैन आणि बौद्ध धर्मात शांती या शब्दाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येकाने साधना करून आपली आध्यात्मिक उन्नती साध्य करावी, असे आवाहन आपल्या प्रवचनातून केले. प्रास्ताविक नितीन चोपडा यांनी केले. सूत्रसंचालन महावीर गोलेच्छा यांनी केले.

## डिजिटल दिव्य दर्शनाची अनुभूती देणारी व्हीआर यंत्रणा श्री मंगळग्रह मंदिरात कार्यान्वित

### आमदार अनिल पाटलांच्या हस्ते उद्घाटन; तंत्रज्ञानाधारित धार्मिक पर्यटनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे श्री मंगळग्रह मंदिराच्या संपूर्ण आभासी दिव्यदर्शनाची अनुभूती देणारा व्हर्च्युअल रिलिटी (व्हीआर) प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. बुधवार, दि. ६ मे रोजी आमदार अनिल पाटील यांच्या शुभ हस्ते विधिवत पूजा करून या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.**

ही यंत्रणा देशात सर्वप्रथम श्री मंगळग्रह मंदिरात कार्यान्वित झाली आहे. हे विशेष! मार्च महिन्यात केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या शुभ हस्ते मंदिरात एआय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती. यानिमित्त श्री मंगळग्रह मंदिर देशातील पहिलेच एआय मंदिर ठरले आहे. ही बाबही यानिमित्ताने अधोरेखित होते. त्यामुळे आता जगभरातील भाविक व पर्यटकांना श्री मंगळग्रह मंदिरासंदर्भातील डिजिटल अनुभव व समग्र माहिती घरबसल्या घेता येणार आहे. तंत्रज्ञानाधारित धार्मिक पर्यटनाच्या दिशेने हे अतिशय महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. डांगरीचे माजी सरपंच अनिल शिसोदे, कामगार नेते एल. टी. पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ.डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस.एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, खजिनदार गिरीश कुलकर्णी, मंगल सेवेकरी विनोद कदम, प्रकाश मेखा, . आशा महालेसह भाविक, भक्त आदी उपस्थित होते.



डिजिटल प्रतिरूप तंत्रज्ञान, जीआयएस नकाशांकन, कृत्रिम बुद्धिमत्ता विश्लेषण, नगररचना आणि अनुभवात्मक पर्यटन उपाययोजना या क्षेत्रात कार्यरत असलेल्या या कंपनीने ड्रोन फोटोग्रॅमेट्री, ३६० अंशीय स्कॅनर आणि प्रगत त्रिमितीय रेंडरिंग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मंदिर आणि परिसराची सविस्तर डिजिटल प्रतिकृती तयार केली आहे.

## शेतरस्त्याचा वाद, ६० ते ७० पोती बाजरी जाळली; दोघांविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल

प्रतिनिधी । अमळनेर

**शेतात जाणाऱ्या रस्त्याच्या जुन्या वादातून दोन व्यक्तींनी एका शेतकऱ्याची ६० ते ७० पोती बाजरी जाळून टाकल्याची धक्कादायक घटना अमळनेर तालुक्यातील जवखेडा येथे ५ मे रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास घडली.**

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अमळनेर पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

जवखेडा येथील आधार देवचंद पाटील (वय ६५) यांची गट क्रमांक ६८२/२ मध्ये सुमारे १ हेक्टर १४ आर शेती आहे. त्यांनी आपल्या शेतात बाजरीची लागवड केली होती. गावातीलच सुभाष नथु पाटील आणि गुलाब मधुकर पाटील यांच्याशी आधार पाटील यांचा गेल्या एक वर्षापासून शेतात जाण्यासाठी असलेल्या रस्त्यावरून वाद सुरू होता. या वादाचा निकाल ५ मे रोजी आधार पाटील यांच्या बाजूने लागला होता.

याच दिवशी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास आधार पाटील हे शेतातून जेवणासाठी घरी आले होते. घरात पाहुणे असल्याने त्यांना शेतात परतण्यास उशीर झाला. रात्री ११ वाजेच्या सुमारास ते शेतात परतले असता, त्यांना त्यांची शेतातील झोपडी आणि बाजरीची गंजी (ढेप) आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेली दिसली. त्याचवेळी गावचे सुभाष आणि गुलाब हे दोघे घटनास्थळावरून पळून जातानाही दिसले, असे आधार पाटील यांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

आधार पाटील यांनी तातडीने धावपळ करत आपला मुलगा संदीप पाटील, तसेच दादाभाऊ पाटील, विकेश माळी, मनोज पाटील, सचिन पाटील, सुरेश पाटील यांना बोलावून घेतले. सर्वांनी मिळून आग विझवण्याचा प्रयत्न केला. आग आटोक्यात येत नसल्याने गावातील जेसीबी मशीन बोलावून गंजी मोकळी करण्याचा प्रयत्नही करण्यात आला, मात्र तरीही ६० ते ७० पोते बाजरी जळून खाक झाली.

या गंभीर घटनेनंतर आधार पाटील यांनी तातडीने गावचे पोलीस पाटील प्रकाश कुऱ्हाडे यांना माहिती दिली.

त्यानंतर अमळनेर पोलीस ठाण्यात सुभाष नथु पाटील आणि गुलाब मधुकर पाटील या दोघांविरुद्ध भारतीय न्यायासंहिता कलम ३२६(फ) (भारतीय दंड संहिता कलम ४३५ किंवा ४३६ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हेडकॉन्स्टेबल काशिनाथ पाटील करीत आहेत. शेतरस्त्याच्या किरकोळ वादातून शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.